# अ.व्या.शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार



देगलूर दि.१० (ता.प्र.)– अडत व्यापारी शिक्षण संस्थेची कार्यकारिणी मंडळाची निवडणूक बिनविरोध संपन्न झाली असुन त्यानिमित्य देगलूर महाविद्यालयात नवनिर्वाचीत कार्यकारी मंडळाचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ. व्या. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर होते.

याप्रसंगी उपाध्यक्ष जनार्धन जयराम चिद्रावार, सहसचिव राजकुमार राम महाजन, कोषाध्यक्ष विलास शंकरराव तोटावार, संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र बालाजीराव मोतेवार, नारायणराव रामन्ना मैलागिरे, रविंद्र काशिनाथअप्पा द्याडे, चंद्रकांत राजन्ना नारलावार यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner